International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 35 March – April - 2026

# लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती : संशोधनाच्या बदलत्या दिशा

**मनीषा उगले[1], प्रा. डॉ. दत्तात्रय केशव गंधारे[2]**

*[1]संशोधक विद्यार्थी, संगमनेर नगरपालिका कला, दा. ज. मालपाणी वाणिज्य व ब. ना. सारडा विज्ञान महाविद्यालय संगमनेर, ता. संगमनेर, जि.अहिल्यानगर.*

*[2]संशोधन मार्गदर्शक, ॲड. एम. एन. देशमुख महाविद्यालय, राजूर., ता. अकोले, जि.अहिल्यानगर.*

*Corresponding Author –* **मनीषा उगले**

**DOI - 10.5281/zenodo.20488274**

**सारांश:**

*प्रस्तुत शोधनिबंधात लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती या विषयातील संशोधनाच्या नवीन दिशा आणि प्रवाहांचे चिकित्सक विवेचन करण्यात आले आहे. मानवी समूहांच्या सामूहिक जाणिवा, त्यांचे अनुभव, मूल्यव्यवस्था आणि त्यांच्या सांस्कृतिक स्मृतींची अभिव्यक्ती म्हणजे 'लोकसंस्कृती' होय. लोकसाहित्याच्या माध्यमातून समाजाचे सर्वांगीण जीवनदर्शन घडते. विसाव्या शतकापर्यंत या अभ्यासाचे स्वरूप बव्हंशी संकलन आणि संग्रहापुरते मर्यादित राहिलेले दिसते. परंतु, एकविसाव्या शतकातील जागतिकीकरण, माहिती तंत्रज्ञानाचा विस्फोट आणि उत्तराधुनिक विचारप्रवाहांशी झालेल्या टकरावामुळे या ज्ञानशाखेचे स्वरूप आता आमूलाग्र बदलताना दिसते आहे. लोकसाहित्याच्या अभ्यासातील पारंपरिक दृष्टिकोन बाजूला सारत सादरीकरण सिद्धांत, स्त्रीवादी जाणिवा, पर्यावरणवादी भूमिका आणि ई - लोकसाहित्य यांसारख्या नव्या प्रवाहांची मांडणी करणे ही काळाची गरज बनली आहे. प्रस्तुत शोधनिबंधातून लोकसंस्कृती आणि लोकसाहित्यासारख्या प्राचीन परंपरा असलेल्या सांस्कृतिक संचितांचे पुनर्मूल्यांकन आणि त्यांच्याकडे निरंतर परिवर्तनशील असणारी सचेतन प्रक्रिया म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन विकसित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.*

***बीजसंज्ञा: लोकसाहित्य, नवदृष्टिकोन, लोकसंस्कृती, स्त्रीवादी लोकअभ्यास, आंतरविद्याशाखीय संशोधन, सादरीकरण सिद्धांत, वंचितांचा इतिहास, पर्यावरणवादी लोकसंस्कृती, ई – लोकसाहित्य, सांस्कृतिक वस्तूकरण, जागतिकीकरण.***

**प्रस्तावना :**

लोकसंस्कृतीची मुळे शोधत हजारो वर्षे मागे जावे लागते. मानवी संस्कृतीच्या उगम आणि विकासात लोकसंस्कृतीची प्रेरणा पायाभूत स्वरूपाची राहिली आहे. निसर्गाच्या कुशीत मुक्तपणे जीवन जगणाऱ्या मानवाच्या उत्स्फूर्त भावभावनांच्या आविष्कारातून लोकसंस्कृती जन्माला आली. निसर्गाशी असलेले एकत्व हे तिचे व्यवच्छेदक लक्षण आहे. लोकसंस्कृतीतील 'लोक' ही संकल्पना केवळ एखाद्या खेड्यापाड्यातील किंवा भौगोलिकदृष्ट्या सीमित जनसमूहापुरती मर्यादित नाही, तर तिच्यातून समान परंपरा, अनुभव, श्रद्धा आणि सांस्कृतिक अभिव्यक्तीची समानता आढळणाऱ्या कोणत्याही समूहाचा निर्देश होतो. परंपरेने प्राप्त झालेले, मौखिक स्वरूपात जतन केलेले आणि सामूहिकरीत्या स्वीकारलेले सांस्कृतिक संचित म्हणजे 'लोकसंस्कृती' होय. लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. लोकसमूहाच्या सुख-दुःखाचे, आचार-विचारांचे आणि जीवनपद्धतीचे यथार्थ दर्शन घडवणारे प्रभावी माध्यम म्हणजे लोकसाहित्य होय. मानवी

इतिहासातील अलिखित राहिलेल्या भावनांना शब्दरूपाने साकार करण्याचे सामर्थ्य लोकसाहित्यात असते.

'लोकसाहित्य' ही संकल्पना प्रथम १८४६ मध्ये विल्यम जॉन थॉमस यांनी 'Folk-Lore' या शब्दातून मांडली. भारतीय आणि विशेषतः मराठी संदर्भात वि. का. राजवाडे यांनी लोकसाहित्याच्या अभ्यासाचा पाया रचला. १९२५ सुमारास त्यांनी लोकसाहित्याच्या संकलनाचे मोठे काम केले. पारंपरिक कथा आणि गीतांचा अभ्यास करून त्यांनी लोकसाहित्याच्या अभ्यासाला मोठीच प्रतिष्ठा मिळवून दिली. लोककथा आणि लोकगीत हे शब्द त्यांनीच प्रथम वापरले. तर डॉ. रा. चिं. ढेरे, दुर्गा भागवत, डॉ. सरोजिनी बाबर, डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर आणि डॉ. प्रभाकर मांडे आदींनी लोकसाहित्याच्या अभ्यासाला शास्त्रीय बैठक मिळवून दिली. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात लोकसाहित्याचे संशोधन प्रामुख्याने संकलन आणि वर्गीकरणापुरते मर्यादित असल्याचे दिसते. विस्मरणात चाललेला सांस्कृतिक वारसा जतन करणे हा त्यामागचा एक मुख्य हेतू होता. परंतु, बदलत्या सामाजिक वास्तवात लोकसंस्कृती स्थिर न राहता परिवर्तनशील आणि गतिशील झाली असल्याचे दिसते. जागतिकीकरण, माहिती-तंत्रज्ञानाचा विस्फोट, शहरीकरण, स्थलांतर, नव्या सामाजिक चळवळी आणि उत्तराधुनिक विचारप्रवाह यांच्या प्रभावामुळे लोकसाहित्याच्या संशोधनपद्धतीत आमूलाग्र बदल घडून येत आहेत. आज लोकसाहित्याकडे केवळ 'संकलित ऐवज' म्हणून न पाहता, सामाजिक परिस्थितीला अर्थ प्राप्त करून देणारी सजीव बाब म्हणून पाहण्याची गरज निर्माण झाली आहे.

लोकसाहित्याची निर्मिती आणि वहन करणारा 'लोक' हा घटक साकल्याने समजून घेण्याबद्दल पं. जवाहरलाल नेहरू यांनी आग्रही भूमिका मांडली आहे. त्यांच्या मते, 'लोकांच्या जोरावर देशाला काही बनायचे असेल, तर त्यांच्या मानसिकतेला व काळाला समजून घ्यावे लागेल. या चित्तवृत्तीच्या प्रकाशात वर्तमानाचे रूप कसे दिसेल हे जाणून घ्यावे लागेल... त्यामुळे आपल्याला आपल्या दृष्टिकोनातून जगाला पाहण्याची एक दिशा मिळेल. आपली स्वतःची एक पायाभूत भूमी असेल, तरच त्या आधारावर आपल्याला आपली भविष्यातील दिशा समजेल; आपले चित्त समजल्याशिवाय आपले काम होणार नाही.'[१]

आधुनिक संशोधनात आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनाच्या आधारे विविध ज्ञानशाखांच्या प्रकाशात लोकसाहित्याचा अभ्यास केला जातो. त्यात प्रामुख्याने समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, मानसशास्त्र आणि आधुनिक तंत्रज्ञान या ज्ञानशाखांचा समावेश होतो. लोकसाहित्याचे सादरीकरण, स्त्रियांचे अनुभव, पर्यावरणवादी दृष्टिकोन, वंचितांचा इतिहास आणि सायबर युगातील लोकसाहित्याचे बदलते स्वरूप या सर्व घटकांचा विचार करून लोकसंस्कृतीच्या प्रवाही आणि बहुआयामी स्वरूपाचे विश्लेषण करणे, हा सदर शोधनिबंधाचा हेतू आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. लोकसाहित्याच्या संशोधनातील संकलन आणि वर्गीकरण ही पारंपरिक पद्धती आणि विश्लेषणाची आधुनिक पद्धती यांच्यातील फरक आणि महत्त्व समजून घेणे.
२. संशोधनातील नवदृष्टिकोनाचे स्वरूप स्पष्ट करणे.
३. आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनातून लोकसाहित्याचा मानववंशशास्त्र, समाजशास्त्र आणि तंत्रज्ञानाशी असलेला संबंध स्पष्ट करणे.
४. सादरीकरणाच्या सिद्धांतातून कलावंताची आंगिक भाषा, देहबोली आणि प्रेक्षकांचा सहभाग यांचा अभ्यास करणे.

५. समाजातील वंचित-उपेक्षित घटक आणि स्त्रिया यांच्या दृष्टिकोनातून लोकसाहित्यातील संघर्ष आणि स्वायत्तता यांचा अभ्यास करणे.

६. निसर्गपूजनाचे लोकपरंपरेतील स्थान आणि शाश्वत जीवनपद्धतीतील तिचे महत्त्व यांचा पर्यावरणीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे. सायबर माध्यमे आणि जागतिकीकरण यांचा लोकसाहित्यावर होणारा परिणाम अभ्यासणे.

**विषय विवेचन:**

लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती हे मानवी मनाचे यथार्थ दर्शन घडवणारे आविष्कार आहेत. प्राचीन काळापासून लोकसाहित्याचे संशोधन विविध प्रकारे होत आलेले आहे. आरंभीच्या काळात हे संशोधन प्रामुख्याने संकलन आणि वर्गीकरणाच्या स्वरूपाचे होते. जेकब आणि विल्हेल्म ग्रिम यांनी १८१२ ते १८५७ या कालावधीत जर्मन लोककथांचे संकलन केले व त्यातून जर्मन परंपरा आणि संस्कृतीचे दर्शन जगाला घडवले. भारतातही विविध प्रांतांतील लोककथा, म्हणी, वाक्प्रचार, लोकगीते, भारुडे, पोवाडे आणि ओव्या यांचे संकलन मोठ्या प्रमाणावर होत होते. परंतु, सुरुवातीच्या काळात या साहित्याचा समाजरचना, समाजातील सत्तासंबंध, लिंगभेद किंवा आर्थिक व सांस्कृतिक बाबींच्या संदर्भात फारसा सखोल अभ्यास झालेला दिसत नाही. लोकसाहित्याच्या संकलनाच्या या पारंपरिक पद्धतीत लोकसाहित्याकडे केवळ लिखित मजकुराच्या दृष्टिकोनातून पाहिले गेल्याचे दिसून येते. त्यामुळे लोकसंस्कृतीच्या विविध पैलूंचा सखोल अभ्यास होणे आवश्यक ठरले.

खरे म्हणजे लोकसाहित्य हे केवळ शाब्दिक कृती किंवा कथानकापुरते मर्यादित नसून, ते सामान्य लोकांचे अनुभव, त्यांची जीवनशैली आणि त्यांच्या सामूहिक-सांस्कृतिक जीवनशैलीचे प्रतीक आहे. लोकसाहित्याचे आधुनिक संशोधन आता परंपरागत मर्यादा ओलांडून त्याची सखोल आणि विविध अंगांनी चिकित्सा करण्याकडे वळले आहे. याबाबत डॉ. द. ता. भोसले यांचे विवेचन अत्यंत महत्त्वाचे आहे, ‘संस्कृतीच्या उबदार वस्त्राची गरज सातत्याने समाजाला हवी असेल तर संस्कृतीलाही समाजाबरोबर चालावे लागते… प्रवाही स्वरूप, स्वीकारशील वृत्ती अन लवचिकता ही संस्कृतीच्या समृद्धीची आणि जिवंतपणाची प्रमुख लक्षणे मानली पाहिजेत.’[२]

मराठी लोकसाहित्याच्या काही अभ्यासकांनी या दृष्टीने महत्त्वाचे काम केले आहे. या अभ्यासकांनी केवळ माहितीचे संकलन न करता लोकजीवनविषयक जाणिवांना नवी वैचारिक परिमाणे प्राप्त करून दिली. रा. चिं. ढेरे यांनी आपल्या तौलनिक आणि आदिबंधात्मक दृष्टिकोनातून दैवतविज्ञानाचा शोध घेत लोकसंस्कृतीची खोलवर रुजलेली मुळे शोधली. त्यामुळे या अभ्यासाला समाजशास्त्रीय दिशा मिळाली. तर डॉ. सरोजिनी बाबर यांनी लोकगीतांच्या अफाट संकलनातून स्त्री-मनाचा सजीव आविष्कार आणि त्यातील सुप्त स्त्रीवादी प्रवाह जगासमोर आणण्याचे काम केले. दुर्गा भागवत यांनी मराठीसह विविध भाषांतील लोककथांची आणि लोकगीतांची चिकित्सा केली, त्यातून मराठी लोकसाहित्याचे जागतिक महत्त्व अधोरेखित झाले. तर डॉ. प्रभाकर मांडे यांनी 'लोकाचार' आणि 'लोकविधी' यांच्या अभ्यासावर भर देऊन या विषयाला एक पद्धतशास्त्रीय परिमाण मिळवून दिले. ते सुचवतात की, ‘लोकसंस्कृतीतील पारंपरिक बाबी, त्यांचे लक्षणविशेष आणि त्यांचे अलीकडे बदलत असलेले स्वरूप यात संवाद निर्माण होऊन त्यात समन्वय घडेल आणि अंतःसत्त्व कायम राहून लोकसंस्कृतीला कालानुरूप स्वरूप कसे प्राप्त होईल,

या दृष्टीने सकारात्मक विचार करून चिंतन करणे आणि सक्रिय होणे आवश्यक आहे.'[३]

अशा प्रकारे, संस्कृतीचे अंतःसत्त्व जपून तिला वर्तमानातील आव्हानांशी जोडण्यासाठी आणि ती मानवी मनाचे सजीव संचित म्हणून टिकवून ठेवण्यासाठी हा नवदृष्टिकोन स्वीकारणे आज अनिवार्य ठरते आहे.

**सादरीकरणाचा सिद्धांत:**

लोकसाहित्याच्या संशोधनातील एक महत्त्वाचा आधुनिक दृष्टिकोन म्हणजे सादरीकरणाचा सिद्धांत होय. लोकसाहित्याचे अमेरिकन अभ्यासक रिचर्ड बाऊमन यांनी Verbal art as performance theory या त्यांच्या ग्रंथातून या दृष्टिकोनाबद्दल विस्ताराने मांडणी केलेली आहे. 'सादरीकरण ही फक्त रंगमंचावर घडणारी क्रिया नसून तो प्रेक्षक आणि कलाकार यांच्यातील संवाद आहे. कलावंतावर आपली कला प्रभावीपणे सादर करण्याचे उत्तरदायित्व असते' असा त्यांच्या सादरीकरण सिद्धांताचा सारांश आहे.[४]

पारंपरिक दृष्टिकोनात प्रामुख्याने मजकुरावर भर दिलेला असून, सादरीकरणाच्या सिद्धांतात मात्र 'लोकसाहित्य ही केवळ वाचनाची गोष्ट नसून अनुभवण्याची बाब आहे' यावर भर दिलेला दिसतो. लोकसाहित्याचे पाश्चिमात्य अभ्यासक सायमन ब्रोनर यांच्या मते, 'लोकसाहित्य हे केवळ सांगितले किंवा लिहिले जाणारे स्वरूप नसून ती प्रत्यक्ष कृतीतून व्यक्त होणारी प्रक्रिया आहे आणि ती व्यक्तींच्या सक्रिय सहभागातून व त्यांच्या कृतीतून साकार होते.' [५]

रिचर्ड शेकनर, व्हिक्टर टर्नर यांसारख्या आणखी काही संशोधकांनी असा विचार मांडला की, लोककलेचा खरा अर्थ तिच्या सादरीकरणात, कलावंताच्या आंगिक भाषेत आणि प्रेक्षकांच्या सहभागात दडलेला असतो.

या सिद्धांतानुसार, लोकसाहित्य अभ्यासताना तीन घटक महत्त्वाचे ठरतात:

**1.कलावंताची कायिक भाषा:** कलावंताचा मुद्राभिनय, हालचाल, आवाजातील चढ-उतार हे शब्दांपेक्षा अधिक प्रभावी ठरतात. उत्कट सादरीकरणामुळे लोककलेला सजीवपणा लाभतो. उदाहरणार्थ, संत एकनाथांचे भारूड फक्त पुस्तकात वाचण्याऐवजी त्याच्या सार्वजनिक ठिकाणी केलेल्या सादरीकरणात त्यातील नाट्य, विनोद आणि नीतिबोध प्रभावीपणे अनुभवास येतो.

**2.सांस्कृतिक अवकाश:** एखादी कला कुठे सादर केली जाणार आहे यावरून तिच्या अर्थवत्तेला वेगवेगळी परिमाणे लाभत असतात. गावातील जत्रा, मंदिर, शेत किंवा घरगुती ठिकाणचा कार्यक्रम यामुळे लोककलेचा अनुभव वेगवेगळ्या प्रकारे येतो. उदा. गावातील सप्ताहाच्या शेवटच्या रात्री भारूडांचा कार्यक्रम असतो, सभोवतालच्या प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे त्याचा प्रभाव अधिक जाणवतो.

**3.प्रेक्षकांचा सहभाग:** समूहभावना हे लोकसाहित्याचे व्यवच्छेदक लक्षण आहे. लोककला बंदिस्त स्वरूपाची किंवा एकतर्फी नसते. ती एकांतात फुलत नाही, तिला लोकानुनयाची आस असते. प्रेक्षकांची दाद, त्यांचा सहभाग, त्यांची उत्स्फूर्त गाणी किंवा नृत्य यांचा सहभाग हा त्या सादरीकरणाचा अविभाज्य भाग ठरतो. कलावंताची आणि प्रेक्षकांची ऊर्जा यांच्या प्रभावातून एकाच कलेचा अनुभव दरवेळी वेगळ्या प्रकारे येतो. म्हणून कलांच्या सादरीकरणाला प्रयोग असे म्हटले आहे. उदाहरणार्थ, गोंधळासारख्या लोककलेच्या सादरीकरणाच्या वेळी प्रेक्षकांमध्ये निर्माण होणारे भावनिक वातावरण हा सादरीकरण सिद्धांताचा अभ्यास करण्याचा विषय ठरतो.

सादरीकरण सिद्धांताच्या अभ्यासामुळे संशोधकांना लोकसाहित्याचे मर्म खऱ्या अर्थाने अनुभवता

येते. फक्त पुस्तके ते वाचल्याने समजू शकत नाही. त्यामुळे पारंपरिक संग्रह आणि वर्गीकरण पद्धतीच्या तुलनेत, या दृष्टिकोनातून लोकसाहित्याचा अभ्यास अधिक सजीवपणे आणि सामाजिक-सांस्कृतिक संदर्भासह घडून येतो.

**स्त्रीवादी दृष्टिकोन:**

लोकसाहित्याच्या संशोधनातील उत्तराधुनिक काळातील महत्त्वाचा नवदृष्टिकोन म्हणजे स्त्रीवादी दृष्टिकोन. पारंपरिक संशोधकांनी स्त्रियांचे योगदान काहीसे 'दुय्यम' मानले, त्यांचा अभ्यास 'घरगुती' अनुभवापुरता मर्यादित राहिला. परंतु, स्त्रीवादी दृष्टिकोनानुसार अभ्यास करणाऱ्या संशोधकांनी लोकसाहित्यातील स्त्री-जाणिवा आणि त्यातील विद्रोहाची सुप्त भावना शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. ही भावना स्त्रीच्या स्वतःच्या अस्तित्व शोधाची आहे.

*अरडी गं बाई परडी, परडी एवढं काय गं*
*परडी एवढं फूल गं, दारी मूल कोण गं*
*दारी मूल सासरा, सासऱ्याने काय आणलंय गं*
*सासऱ्याने आणल्या पाटल्या*
*पाटल्या मी घेत नाही, सांगा मी येत नाही*
*चारी दरवाजे लावा गं बाई, लावा गं बाई*
*झिपरं कुत्रं सोडा गं बाई*

अशा स्त्री गीतांतील सूर थट्टेचा असला तरी त्यांतून सुप्त असा बंडखोरपणा देखील वेळोवेळी व्यक्त झालेला आहे. स्त्रीमनाचा आणि तिच्या कौटुंबिक, सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी स्त्री गीतांचा स्त्रीवादी दृष्टिकोनातून अभ्यास करण्याची निकड आधुनिक अभ्यासकांना वाटू लागली आहे.

डॉ. तारा भवाळकर यांच्या मते, 'बाईच्या स्थितीगतीचा शोध घेण्यासाठी लोकपरंपरा आणि लोकसाहित्य हे सर्वाधिक विश्वसनीय साधन आहे.'[६] लोकगीतांतील स्त्रीवादी जाणीव केवळ त्यांच्या जगण्यातील वेदना आणि शोषणाचा उच्चार करणारी नसून, ती स्त्रीच्या स्वतःच्या 'स्वत्वाचा' शोध घेणारी एक अव्याहत प्रक्रिया आहे. स्त्रीला एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्त्रीला मिळालेली स्वतःच्या अस्तित्वाची, हक्कांची आणि सामाजिक प्रगल्भतेची जाणीव म्हणजे स्त्रीवादी जाणीव होय. लोकगीते, म्हणी, उखाणे, कोडी असे लोक साहित्यातील मौखिक विधांचे काही प्रकार आहेत. त्यांतून या जाणिवा वारंवार प्रकट झाल्या आहेत. 'जगभर प्रदीर्घकाळ जी पितृसत्ताक समाजव्यवस्था अस्तित्वात आहे, त्या व्यवस्थेने जैविक लिंगभेदाला सांस्कृतिक लिंगभेदाचे रूप दिले. आपले हितसंबंध जपण्यासाठी स्त्री-पुरुष यांच्यात एक विशिष्ट सत्तासंबंध रचला. या सत्तासंबंधात स्त्रीला गौण व दुय्यम ठरविले गेले. स्त्रीचा स्वभाव, लक्षणे, कार्यक्षेत्रे, कर्तव्ये या सत्तेने निश्चित केली व स्त्रीवर लादली. या गोष्टीची जाणीव म्हणजे स्त्रीवादी जाणीव होय.' [७]

स्त्रीवादी संशोधन स्त्रियांच्या सांस्कृतिक निर्मितीकडे स्वतंत्र सांस्कृतिक विश्व म्हणून पाहते.

**पर्यावरणवादी दृष्टिकोन:**

लोकसाहित्य संशोधनातील एक समकालीन महत्त्वाचा नवदृष्टिकोन म्हणजे पर्यावरणवादी दृष्टिकोन. मानवी संस्कृती निसर्गाच्या निकटतम नांदणारी असल्यामुळे लोकसाहित्यात निसर्गसंवर्धनाचे आदिम विज्ञान दडलेले आहे. आपल्या पूर्वजांनी पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी कोणतेही 'पर्यावरणशास्त्र' अभ्यासले नव्हते, परंतु, त्यांनी परंपरेतून, गाण्यांतून आणि कथांतून ही जाणीव जपली आहे. लोकसाहित्यात झाडांना केवळ लाकूडफाटा देणारी वस्तू मानले जात नाही. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' ही भावना त्यात ओतप्रोत भरलेली आहे. महाराष्ट्रातील 'देवराई' ही याचे उत्तम उदाहरण आहे. देवाच्या नावाने जंगल राखणे आणि जंगलातील जैवविविधता जपणे हे

सामाजिक बांधिलकीचे रूप आहे. वड, पिंपळ आणि तुळस यांसारख्या झाडांची पूजा करणे हा केवळ धार्मिक विधी नसून, तो झाडांचे पर्यावरणातील महत्त्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न आहे.

लोककथा, गाणी, सण यांमधून निसर्गाशी असलेले मानवी नाते स्पष्ट होते. वारली समूहांच्या तारपा नृत्यातून, भित्तिचित्रांतून, चंद्र सूर्य पशुपक्षी आणि झाडे यांना दिलेले मध्यवर्ती स्थान हे त्यांच्या निसर्ग-केंद्रीय जीवनशैलीचे दर्शन घडवते. लोकपरंपरेतील जवळपास सर्वच सण हे निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचे सण आहेत. नागपंचमी, बैलपोळा, वटपौर्णिमा यांसारखे सण ही त्याचीच उदाहरणे आहेत. आधुनिक काळाच्या संदर्भात लोकसाहित्याचे संशोधक आता या लोकपरंपरांचा अभ्यास शाश्वत जीवनपद्धतीसाठी करू लागल्याचे दिसत आहेत. जागतिक तापमानवाढीचा धोका ओळखून पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी लोकसंस्कृतीच्या उपायांची उपयुक्तता तपासली जात आहे. कौटिलीय अर्थशास्त्रात झाडे-झुडुपे नष्ट करणाऱ्यांसाठी वेगवेगळ्या प्रकारच्या दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे. घरोघरी सांगितल्या जाणाऱ्या लोककथांचे नायक अनेकदा प्राणी आणि पक्षी हेच असतात. पंचतंत्र किंवा जातक कथांमधून प्राण्यांबद्दलची सहानुभूती आणि त्यांच्याशी असलेल्या मानवी नात्याचा उच्चार वारंवार आवृत्त झाला आहे. निसर्गाचा कोप झाला तर मानवाचे जीवन कसे उद्ध्वस्त होऊ शकते, याचे संकेत अनेक लोककथांमध्ये दिलेले असतात. लोकगीतांमधून नद्यांची विपुल वर्णने आढळतात. नद्यांना ‘लोकमाता’ मानण्याची परंपरा लोकसाहित्यात आहे. गंगेपासून ते नर्मदेपर्यंत आणि गावातल्या ओढ्यांपर्यंत सर्वांचे वर्णन लोकगीतांमध्ये आदराने केले जाते.

थोडक्यात, लोकसाहित्याचा निसर्गाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा भोगवादी नसून भावमयतेचा आहे. लोकसाहित्याने निसर्गाला 'उपभोग्य वस्तू' न मानता 'सहजीवन जगणारा मित्र' मानले आहे. हीच जाणीव आजच्या काळात जागतिक तापमानवाढीसारख्या समस्यांवर मात करण्यासाठी महत्त्वाची ठरू शकते.

**ई - लोकसाहित्य:**

माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे लोकसाहित्याचे स्वरूप आता बदलताना दिसते आहे. मौखिक परंपरेतून पूर्वापार पिढ्यानपिढ्या जतन केले गेलेले लोकसाहित्य आता **इलेक्ट्रॉनिक** माध्यमांच्या द्वारे एका क्लिकसरशी जगभर पोचते आहे. व्हॉट्सॲप, यूट्यूब आणि इंस्टाग्राम आदी समाजमाध्यमांच्या रूपाने लोकसाहित्याला नवे व्यासपीठ लाभले आहे. उदाहरणार्थ, व्हायरल होणाऱ्या मीम्सचे स्वरूप आधुनिक लोककथा किंवा वाक्प्रचारासारखेच आहे. पारंपरिक उखाणे, म्हणी, लोककोडी, लोकगीते यांची निनावीपणा, उत्स्फूर्तता आणि समूहाने स्वीकारलेली भावना ही वैशिष्ट्ये मीम्समध्येही दिसतात. उदा. कांताबाई शिंदे यांच्यासारख्या ग्रामीण कवयित्रीच्या स्वरचित ओव्या सध्या **इलेक्ट्रॉनिक** माध्यमातून सर्वदूर पोहोचताना दिसत आहेत. घरातील अथवा ज्येष्ठ महिलांनी गायन केलेल्या अनेक ओव्या आणि स्त्रीगीते यूट्यूबवर मोठ्या प्रमाणात पाहायला मिळत आहेत. या साहित्याचे जतन आणि प्रसार त्या माध्यमातून होतो आहे, ही आशादायक बाब आहे. यूट्यूबवरील पोवाडा, ओव्या किंवा वाघ्या-मुरळी यांचे सादरीकरण आता जागतिक स्तरावर पाहिले जाते; परंतु त्याला काहीसे मार्केटिंगचे स्वरूपही आलेले दिसते. त्यामुळे या लोककलांचे ‘वस्तूकरण’ होण्याचा धोका निर्माण होतो. डिजिटल युगात लोकसाहित्य अधिक लोकशाहीवादी झाले असले तरी संशोधनासाठी त्याची मूळ ओळख आणि अस्सल अर्थ ओळखता येणे मात्र आवश्यक आहे. रिचर्ड

डॉरसन यांनी बनावट साहित्यासाठी 'फेकलोर' ही संज्ञा वापरली आहे. 'खरे लोकसाहित्य आणि 'फेकलोर' यांतील फरक अभ्यासकाला ओळखता आला पाहिजे' असा त्यांच्या प्रतिपादनाचा आशय आहे.[८]

**वंचितांचा इतिहास आणि लोकसंस्कृती:**

इतिहासाचे लेखन प्राचीन आणि मध्ययुगीन काळात प्रामुख्याने सत्ताधारी वर्गाला केंद्रस्थानी ठेवून लिहिले गेलेले दिसते. त्यामुळे समाजातील दलित, आदिवासी आणि स्त्रिया अशा काही घटकांचा इतिहास उपेक्षित राहिलेला दिसतो. अशा समूहांचा इतिहास लिखित स्वरूपात फारसा उपलब्ध नसला तरी लोकसाहित्य हे या समूहांच्या मौखिक स्मृतींचे जतन करणारे एक प्रभावी साधन आहे. महाराष्ट्रातील सामान्य लोकांचा इतिहास शोधताना क्रांतिकारी पोवाडे, स्त्रीगीते, लोकगीते आणि आदिवासी गीते यांची बरीच मदत होते. उदाहरणार्थ, बिरसा मुंडा आणि राघोजी भांगरे यांची चित्रणे लोककथांमधून लोकनायक या स्वरूपात केली गेलेली आहेत. दलित लोकसाहित्यात जलसे, भीमगीते, तमाशा आणि वगनाट्य यांचा वापर सामाजिक समतेचा विचार मांडण्यासाठी केला जातो. समाजातील उपेक्षित समूहांचा आत्मसन्मान आणि त्यांच्या संस्कृतीचे महत्त्व लोकसाहित्याच्या माध्यमातून अधोरेखित होते.

**जागतिकीकरण आणि सांस्कृतिक वस्तूकरण:**

जागतिकीकरणामुळे स्थानिक लोकसंस्कृतीचे अवकाश विस्तारले असून तिला आता जागतिक स्तरावर व्यासपीठ मिळू लागले आहे. परंतु त्याच वेळी लोकसंस्कृतीतील लोककलांचे बाजारीकरणही होण्याचा धोका वाढू लागलेला आहे. जसे की, आदिवासी वाद्ये, चित्रकला, आभूषणे आणि अलंकार यांची मागणी शोभेच्या वस्तू म्हणून मोठ्या प्रमाणात वाढू लागलेली आहे. त्यामुळे या गोष्टींमागचा निर्मळ भाव नाहीसा होऊन त्याला फक्त व्यापारी मूल्य प्राप्त होण्याचा धोका वाढतो. लावणी ही मुळात सामाजिक आणि शृंगारिक भाव व्यक्त करणारी उत्तम लोककला होती; परंतु जागतिकीकरणामुळे तिचे स्वरूप काहीसे उथळपणाकडे झुकताना दिसते आहे.

जागतिकीकरणामुळे लोकसाहित्याचा सोयीस्कररीत्या वापर होतो; मागणी तसा पुरवठा या न्यायाने बाजारमूल्य असणाऱ्या काकांनाचरl भागअधिक उठाव मिळतो. तरी देखील स्थानिक आणि जागतिक मूल्यांचा यांचा समन्वय साधून संशोधक लोकसाहित्याची मूळ ओळख जपण्याचा प्रयत्न करत आहेत. स्थानिक व्यासपीठावरून जागतिक व्यासपीठावर पोहोचणाऱ्या लोकसाहित्याची सांस्कृतिक स्वायत्तता टिकवताना, त्याचा मूळ गाभा जपणे हे संशोधनाचे मुख्य लक्ष्य बनले आहे.

**आंतरशाखीय दृष्टिकोन:**

लोकसाहित्य संशोधन आता समाजशास्त्र, मानवशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र, माध्यम अभ्यास, सांस्कृतिक अभ्यास यांसारख्या शाखांशी जोडले गेले आहे. लोकपरंपरा या केवळ संहिता नसून तो सामाजिक व्यवहार असल्याचे लक्षात घेऊन सण, उत्सव, जत्रा, लोकनाट्य यांचा समाजरचनेशी असलेला अनुबंध तपासला जातो.

महाराष्ट्रात पोवाडे, ओव्या, भारुड, गोंधळ, लावणी, वासुदेव, दिंडी, कीर्तन अशा लोककलांची समृद्ध परंपरा आहे. **इलेक्ट्रॉनिक** माध्यमांमुळे लावणी, पोवाडा यांना जागतिक व्यासपीठ मिळाले आहे. संशोधकांवर आता फक्त संहितांचे विश्लेषण करण्याची जबाबदारी नाही, तर कलाकारांचे जीवन, सामाजिक संदर्भ, प्रेक्षकांचा सहभाग, माध्यमांचा प्रभाव, आर्थिक परिस्थिती आणि

जागतिकीकरणाचा परिणाम यांचा अभ्यास करण्याचीही जबाबदारी आहे.

**निष्कर्ष:**

लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती संशोधनातील नवदृष्टिकोनांचा आढावा घेतल्यावर असे लक्षात येते की, लोकसाहित्य हे केवळ भूतकाळातील संचित नसून ती एक प्रवाही आणि सचेतन बाब आहे. पारंपरिक पद्धतीने केलेल्या केवळ संग्रहण आणि वर्गीकरणाच्या मर्यादा ओलांडून आजचे संशोधन सादरीकरण, स्त्रीवाद, पर्यावरण आणि **इलेक्ट्रॉनिक** माध्यमांच्या क्षेत्रात विस्तारले आहे. यातून काही महत्त्वाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे मांडता येतील:

१. लोकसाहित्य हे काळाप्रमाणे स्वतःचे रूप बदलत असते. निरंतरता हे त्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. सादरीकरणाच्या सिद्धांतामुळे हे स्पष्ट होते की, लोककला ही स्थानिक आणि सामाजिक संदर्भानुसार नवनवीन अर्थ प्रकट करते.

२. स्त्रीवादी दृष्टिकोनामुळे लोकसाहित्यातील स्त्रीचे स्थान ही केवळ 'दुय्यम' प्रकारचे न राहता, ती स्वतःच्या संघर्षाचे आणि जाणिवांचे सक्षम दर्शन घडवणारी 'कर्ती' म्हणून समोर येते. ओव्या आणि लोकगीतांसारख्या मौखिक साहित्यातून तिचा प्रतिरोध आणि पितृसत्तेला दिलेले सुप्त आव्हान व्यक्त झाल्याचे दिसते.

३. पर्यावरणाशी जोडलेल्या लोकपरंपरा हे केवळ धार्मिक विधी नसून, ते निसर्गसंवर्धनाचे शास्त्रशुद्ध मार्ग आहेत. पर्यावरण बदलाच्या काळात लोकसंस्कृतीतील निसर्गसन्मुखता ही मानवी समाजासाठी दिशादर्शक ठरणारी आहे.

४. आंतरजाल आणि समाजमाध्यमांमुळे लोकसाहित्य अधिक लोकशाहीवादी झाले आहे. या माध्यमातून ते सर्वदूर पोहोचत असले तरी, त्याचे व्यापारीकरण होऊन त्याचे अवमूल्यन होण्याचा धोकाही आहे. त्याबाबत संशोधकांनी सजग आणि विवेकी दृष्टिकोन बाळगणे आवश्यक आहे.

५. वंचित आणि उपेक्षितांच्या जगण्याचा इतिहास लोकसाहित्याच्या रूपाने जतन झाला आहे. लिखित इतिहासाकडून दुर्लक्षित राहिलेल्या सामाजिक वास्तवाला जगापुढे आणण्याचे सामर्थ्य लोकसाहित्यात असल्याचे याद्वारे सिद्ध होते.

**समारोप:**

लोकसंस्कृती हे मानवी जीवनाचे अस्सल प्रतिबिंब असून लोकसाहित्यातून तिचे यथार्थ दर्शन घडते. विसाव्या शतकापर्यंत या ज्ञानशाखेचा अभ्यास प्रामुख्याने संकलन आणि वर्गीकरणापुरता मर्यादित होता. मात्र, एकविसाव्या शतकातील जागतिकीकरण आणि उत्तराधुनिक दृष्टिकोनामुळे लोकसाहित्याचा अभ्यास सामाजिक आणि ऐतिहासिक संदर्भात अर्थनिर्मिती करणारी एक सचेतन प्रक्रिया म्हणून होऊ लागला आहे.

आज सादरीकरण सिद्धांत, स्त्रीवादी जाणिवा, पर्यावरणवादी भूमिका आणि ई - माध्यमांच्या प्रभावामुळे लोकसाहित्याला नवी वैचारिक परिमाणे प्राप्त होत आहेत. लोकसाहित्य हा केवळ गतकालीन संचिताचा वारसा किंवा संग्रहालयातील 'पुरावशेष' नसून, तो निरंतर प्रवाही असलेला मानवी संस्कृतीचा आत्मा आहे. जागतिकीकरणाच्या वेगवान रेट्यातही या साहित्याची चैतन्यशीलता आणि सांस्कृतिक स्वायत्तता टिकवणे ही काळाची गरज आहे. त्यासाठीच, लोकसाहित्याचा उपयोग समाज परिवर्तन आणि शाश्वत जीवनपद्धतीसाठी मार्गदर्शक म्हणून करणे हीच खऱ्या अर्थाने संशोधनातील 'नवदृष्टी' ठरेल.

**संदर्भ ग्रंथसूची:**

१. मांडे, प्रभाकर. (२०१८). *लोकमानस आणि लोकाचार*, अहमदनगर: गोदावरी प्रकाशन, पृष्ठ ६ वरून उद्धृत.

२. भोसले, द. ता. (२०१०). *लोकसंस्कृती : बंध – अनुबंध*, पुणे: पद्मगंधा प्रकाशन, पृष्ठ ४३.

३. मांडे, प्रभाकर. (२०१६). *लोकसंस्कृती आणि इतिहास दृष्टी*, अहमदनगर: गोदावरी प्रकाशन, पृष्ठ ३१.

४. Bauman, Richard. Verbal Art as Performance. Waveland Press, 1984. 9th edition.

५. Bauman, Richard, and Charles L. Briggs. (1990). ‘Poetics and Performances as Critical Perspectives on Language and Social Life’, *Annual Review of Anthropology*, vol. 19, pp. 59-88.

६. भवाळकर, तारा. (२००९). ‘स्त्रीवाद: एक दृष्टिक्षेप’, संपा. अरुणा सबाने, नागपूर: आकांक्षा प्रकाशन, पृ. ८२-८३.

७. इनामदार, श्री. दे. आणि विद्युत भागवत. ‘स्त्रीवादी साहित्य’, *मराठी विश्वकोश*, ऑनलाईन आवृत्ती.

८. https://share.google/W2gz22hqMUHlRVE9i